The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत रोहिदास : समाजसुधारक व महामानव

संशोधक : वृषाली दयानंद बनसोडे
विद्यापीठ : मराठी विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेश खिंड,पुणे.

"सकल कुटुंबी मित्राजन,प्रेममग्न नर नारी |
प्रेम करे रविदाससे, मनमें मोद अपार ||"

संत रोहिदस हे संत परंपरेतील एक महान कवि व संत होऊन गेले आहेत. त्यांची अभंग रचना हिंदीत असल्याने हिन्दी भाषिकांना ती आपलीशी व जवळची वाटते. त्यामुळे त्यांच्या वाङमयाची नोंद हिन्दी साहित्यात झालेली पाहायला मिळते. व संशोधनही हिन्दी साहित्यातच झालेले पाहायला मिळते.असे असले तरी, मराठी वाङमयातही त्यांनी मोलाची भर घातली आहे. हे नाकारता येत नाही. कारणं त्या काळातील माणसांची मानसिकता ते उगळून पिलेले होते, त्यामुळे त्यांचे साहित्य विशिष्ट प्रकारची छाप पाडून जाते. म्हणून तर एक प्रबोधनकार म्हणून इतिहास त्यांची नोंद घेते.

दहाव्या शतकानंतर उत्तरभारतातील जनजीवन विस्कळीत झालेले होते. राजकीय गुलामगिरी, सामाजिक व आर्थिक विषमता यात सामाजिक स्वास्थ्य हरवून बसले होते अशा समाजाला योग्य पोषणाची गरज भासत चालली होती. तेराव्या शतकापर्यंत दुर्दैवाचा अवडंबर माजला होता. नेमके याच काळात महाराष्ट्रातून भक्तीची पताका घेऊन संत नामदेव महाराज पंजाबात आले.ते आपल्या सोबत ज्ञानियांचा राजा ज्ञानेश्वर यांना देखील घेऊन आले होते.या ठिकाणी त्यांची लेखणी देखील बदललेली दिसते. ते पहिल्यांदा हिन्दी भाषेतून आपले विचार मांडताना दिसतात.शिखांच्या 'गुरु ग्रंथ साहिबा' मध्ये देखील त्यांचे अभंग दोहे रूपाने प्रसिद्ध आहेत.

पढे तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात संत रामानंदांचा भक्ति प्रवाह सुरू झाल्याचे जाणवते. त्यांनी अन्यायाविरुद्ध,रूढी,परंपरा,अंधश्रद्धा यांच्या विरुद्ध बंड पुकारले होते. त्यांचा सहज साधनेवर विश्वास होता. रामनंदांनी सर्वसमावेशक दृष्टिकोण स्वीकारला होता.त्याचाच प्रभाव संत रोहिदासांवर झालेला पाहायला मिळतो. रोहिदासांनच्या जन्माच्यावेळची पार्श्वभूमी लक्षात घेता, 'धर्मसंस्थापनार्थय सांभवामि यूगे युगे' या उक्तीची आठवण होते. ज्यावेळी धर्माला ग्लानि येते त्यावेळी संत महातम्याचा जन्म होतो असे म्हटले जाते.अशाच पार्श्वभूमीवर संत रोहिदासांचा जन्म झाला असे म्हटल्यास काही वावगे ठरणार नाही. इ. स. १४ व्या शतकाच्या उतरार्थात १३७६ साली माघ पौर्णिमेस,रविवारी त्यांचा जन्म वाराणसी नजीकच्या मांडुर या गावी झाला. त्यांच्या जन्म नेमका कधी झाला या विषयी बरीच मत मतांतरे पाहायला मिळतात.संत रोहिदासांचे पणतू धर्मदास जे होते त्यांच्या समकालीन असणारे करमदास होते,त्यांच्यामते रोहिदासांचा जन्म माघ पौर्णिमा संवत १४३३ (इ. स. १३७६)असा त्यांनी मानला आहे.आणि त्या दिवशी रविवार येतो. इतर कोणत्याही जन्म तिथीला येत नाही. (करमदासांनी रोहिदासांच्या साक्या (दोहे)धर्मदासांकडून लिहून घेतल्या होत्या)

श्रीरामचन्द्र कुरील यांनी संत रोहिदासांचा जन्म संवत १४७१ (इ. स.१४१४)निश्चित केला आहे.कारण त्यावर्षीही माघ शुद्ध पौर्णिमेस रविवार आहे. जानी बरकतसिंह आनंद यांनीही 'जन्मसाखी

श्री. रविदास भगतजी' नावाच्या पोथीमध्ये ह्या तिथिलाच जन्म झाल्याचे मानले आहे. श्री. दर्शनसिंह यांनीही याच तिथीचे समर्थन केले आहे. श्री. बनारस घेरा 'सीर गोवर्धनपूर'मध्ये मिळालेल्या प्राचीन पांडू लिपीमध्ये रोहिदासांचा काल इ. स.१४१४ ते १५४० असामानला गेला आहे.चर्मकार समाज देखील माघ पौर्णिमेलाच रोहिदासांची जयंती साजरी करतात.

रोहिदासांच्या जन्मस्थानाविषयी देखील अशीच मत मतांतरे पाहायला मिळतात.आनंतदास वैष्णव यांच्या 'भक्त रत्नावली'मध्ये रोहिदासांचा जन्म बनारसजवळ झाल्याचा उल्लेख सापडतो तर काहींचे म्हणणे आहे की त्यांचा जन्म मांडुरगढ येथे झाला.रैदास रामायण मध्ये मांडूर हेच रोहिदासांचे जन्मस्थान दाखवले आहे. परशुराम चतुरवेदि,वेणीप्रसाद शर्मा, आचार्य पृथ्वीसिंह आझाद असे बरेच विद्वान रोहिदासांचा जन्म मांडूर येथे झाल्याचे सांगतात. काही लोक त्यांचा जन्म गुजरात,राजस्थान मध्ये झाल्याचे सांगतात. माझ्यामते संत रोहिदासांचा जन्म मांडूर येथेच झाला असावा,कारण त्यासंदर्भातील त्यांची उक्ती पाहायला मिळते.

कासी ढीग मांडूर स्थाना,शुद्ध वरण करत गुजराना |
मांडूरनगर लीन औतारा,रविदास सुभ नाम हमारा |

- गुरु रविदास, पृष्ठ ११.

यावारून त्यांचा जन्म मंडूर येथे झाल्याचे स्पष्ट होते. जातीने ते चांभार होते. त्यावेळी अंधश्रद्धा,कर्मठ रूढी परंपरा,जातीय व वर्गीय उच्चनिचता यात संपूर्ण समाज गढून गेला होता. अश्या काळात स्वामी रामानंद,आनंतानंद, सेना न्हावी, ही सर्व होते. मात्र यामध्ये संत रोहिदास हे विशेष कार्य करून गेले. त्यांचे प्रबोधनकारी व्यक्तिमत्व सर्वांनाच भावून गेले.तसेच त्यांचे कर्तुत्वही त्यागमय असल्याचे आपल्याला जाणवते. आशा महान संतांविषयी

संत कबीर म्हणतात - " संतनमे रविदास संत हे "|

नामदेव म्हणतात - " संदेह ग्रंथिखंडननिपुण वाणी विमल रैदासकी "|

संत मीराबाई म्हणतात - "संत रैदास मिले मोहि - ज्योतिसे ज्योति मिली "|

भक्तिविजय ग्रंथाचे लेखक माहीपतिबुवा -"एका श्रोते हो सावकाश | परम वैष्णव रोहिदासहरिभजन रात्रंदिवस प्रेमभावे कारीतसे"|

संत दास गणू - "जन्म झालसे चर्मकारवंशी |ज्ञान पाहता लाजवी वसिष्ठाशी" |

आधुनिक कालखंडात -

सावरकर -संत रोहिदास |रोहिदास संत, जयासि भेटे भगवंत ||ध् ||हिंदू चांभार मनाचा,प्रेमळ अनिवार || नित्य कर्म त्याचे | देई दान भक्ता, वाहणा अनवाणी त्या त्या

अश्या प्रकारे अनेक संतांनी त्यांच्या विषयी व त्यांच्या कार्या विषयी भरभरून कौतुक केले आहे.

**जन्माविषयीची दंतकथा -** पंचगंगा घाटावर रामानंदांच्या आश्रमात भोजन व्यवस्था भिक्षा मागून होत असे. एके दिवशी भिक्षा मागण्यासाठी एक ब्रह्मचारी शिष्य काशीत गेला होता. परंतु त्या दिवशी खूप पाऊस पडल्याने त्याला घरातून बाहेर पडता आले नाही. त्यावेळी त्यांची अडचण समजून घेऊन एक

प्रौढ दांपत्य त्याला दुकानातून शिधा सामग्री देतात आश्रमवासी पोटभर जेवतात.परंतु रामानंदांना जेवण जात नाही. त्यांना सतात कोणत्यातरी मुलाचा भास होत राहतो. समाधी लावल्यानंतर त्यांना समजते की,पुत्र प्राप्तीच्या लालसेने ही दान केले गेलेले आहे. तेव्हा रामानंद,ब्राह्मचारी शिष्याला खारी हकीकत विचारतात व या अपराधासाठी "तुम्हास पुत्र रूपात त्या शूद्र दाम्पत्याच्या पोटी घरी जन्म घ्यावा हवा."त्याचा परिणाम कालांतराने त्या ब्रह्मचाऱ्याने राऊ कर्माच्या घरी भक्त रोहिसाच्या रूपात जन्म घेतला.

स्वामीजींच्या शिष्याने आलस्यवश चामडयाच्या व्यापाऱ्यांकडून भिक्षा घेण्याचा अपराध केला.त्या ब्रह्मचाऱ्यास स्वामीजींच्या शापामुळे आपल्या शरीराचा त्याग करावा लागला. व एका चांभाराच्या घरी रोहिदासाच्या रूपात जन्म घ्यावा लागला.पूर्व संस्कारांमुळे तो स्वामीजींच्या आश्रमात येऊन त्यांचा शिष्य झाला.अनंतदसाने 'रैदासकी परची' मध्ये एक कल्पना केली आहे की,रोहिदास पुर्व जन्मात नारद होते.

'और एक रैदास चमारा | जानू नारद लियो अवतार |
शूद्र कंहू तो आवे लाजा| दर्सन काराण कता पे राजा'||१०१ ||

- गुरु रविदास पृष्ठ १६.

आणखी एक मत भक्त रत्नावली मध्ये, पृष्ठ ३३ मध्ये आढळते.

'जाती चमार पिता अरू माई | सापित के घर जनम्यो आई' |

रोहिदास पूर्व जन्मात ब्राह्मण असूनही मांस खाल्ले होते. म्हणून या जन्मात चांभारच्या घरी जन्म घ्यायला लागला होता.

ह्या आशा कथा कितपत खऱ्या मानायच्या हा एक प्रश्नच आहे. परंतु रोहिचे कार्य पाहून त्यांना आनंद उच्च स्थान प्राप्त करून देण्यासाठी रोहिदास हे आपल्याच वंशातील आहे.उच्चवंशीय कुळात जन्माला आलेले आहेत. असे मांडण्याचा आट्टाहास जाणवतो.

संत रोहिदास हे ब्राह्मण होते की नाही हा वादाचा विषय आहे कारण जगातील कोणतीही व्यक्ति आपण मागच्या जन्मी कोण होतो ही सांगू शकत नाही. शिवाय रोहिदासांचे गुरु रामानंद यांनी ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य, शूद्र,चांडाळ,पशू,पक्षी,यांनासुद्धा आपलेसे केले होते. रामानंद आपल्या प्रवचनात सांगतात की,'जो मानव ( स्त्री- पुरुष ) रामास शरण जात असे,तो दयाळू राम भक्तांचे कुळ,वंश, गरीब,श्रीमंत यांचा विचार न करता त्यांना आपलेसे करतो. भक्ति करणे हा कुण्या एका जातीचा मक्ता नाही;भक्ति करण्याचा सर्व प्राणिमात्रांना अधिकार आहे.' हे एकून तर रोहिदास 'रामदास'बनले.त्यामुळे वरील गोष्टी रोहिदासांच्या व रामानंदांच्या कार्याला गालबोट लावतील आशा आहेत.

**रोहिदासांचे वैवाहिक जीवन** -रोहिदासांचे रामभक्तीचे वेड वाढत चालले होते शिवाय साधुसंताना ते फुकट जोडे (चपला)देत. आपल्या मुलाची उदार वृत्ती व भक्तिवेडेपणा पाहून त्यांचे लग्न 'लोणा' हिच्याशी झाले. तिनेही आपल्या पतीची संसारात व भक्ति मार्गात साथ दिली. लोणा लावण्यवती व दयाळू वृत्तीची होती आजही तिला चर्मकार समाजात देवीच्या रूपात पूजले जाते.आपल्या मुलांच्या

संरक्षणासाठी तिला भाकले जाते.एवढेच नव्हे तर तिच्या नावाने मंत्र देण्याचीही प्रथा आहे. असा उल्लेख दलितमित्र श्री. मा. आ. कारंडे यांच्या पुस्तकात आढळतो. रोहिदासांच्या भक्तीवेडेपणामुळे धंदा व संसाराचे नुकसान व्हायला लागले होते. त्यामुळे त्यांचे वडील राघू त्यांना पत्नीसह वेगळे काढतात. उलट रोहिदास आनंदतात,आपल्याला आता मनसोक्त भक्ति करायला मिळणार याउदेशाने वडिलांना कोणताही विरोध न करता घराच्या मागे झोपडी बांधून राहतात. व आपला गुजराना करतात. या ठिकाणी मला लोणाची समर्पण वृत्ती भावते कोणतीही संसारिक लालसा न ठेवता ती आहे त्या परिस्थितीत समाधान मानून सुखी राहते. ती कोणतीच अपेक्षा रोहिदासांकडून करत नाही. तिचे लग्नाच्या वेळचे वयही लहान आहे. तरी तीची परिवारीक,आध्यात्मिक समज प्रौढ आहे. त्यामुळेच तिला आध्यात्मिक क्षेत्रात मान मिळाला असावा. हे नाकारता येत नाही.

**रोहिदासांची गुरु भक्ति –**श्री संत रोहिदास ग्रंथामध्ये असे कथन केले आहे की,जेव्हा कबिराने रामनंदांचे शिष्यत्व स्वीकारण्याचा सल्ला दिला तेव्हा रोहिदास काशीच्या गंगा किनारी पंचघाटावर जाऊन रामानंदांचे दुरूनच दर्शन घेतले. यांचे रामनांदाना आश्चर्य वाटले. तेव्हा रामनंदांनी यांचे कारण विचारल्यावर ते म्हणाले, ‘मी शूद्र आहे. माझा जन्म चांभार जातीत झाला आहे.’

तेव्हा रामानंद म्हणाले, ‘अरे कसली जात ? तू शूद्र नाहीस. तू चांभार नाहीस. तू माझा बंधू आहेस.

तेव्हा रोहिदास म्हणाले, “नाही महाराज मी ज्ञानाचा भुकेला आहे. आपण मला शिष्य करावे. आणि ब्रह्मज्ञान द्यावे. कारण काशी विद्यापीठाच्या शंकराचार्यांनी शास्त्रार्थ वादविवादामध्ये मला हरवले आहे. आपणास गुरु करून घेण्याबद्दल मला कबिरांनी सल्ला आहे. त्याप्रमाणे आपण माझा शिष्य म्हणून स्वीकार करावा.”

तेव्हा रामानंदांनी ‘तथास्तु’ म्हटले. तेव्हा रोहिदासांना आत्यानंद झाला.या ठिकाणी रामानंदांची अस्पृश्य विषयाच्या कल्पना स्पष्ट दिसतात.सर्वसमावेशक दृष्टी व शिष्याविशीची करुणा जाणवते.शिवाय रोहिदासांचीही आध्यात्मिक शिक्षणाविशीची लालसा जाणवते.

‘चल मन हरि - चटसाल पढाऊ |
गुरु की साटी, ज्ञान का अच्छर,विसरे तो सहज समाधि लाखाऊ |
प्रेम की पाटी, सुरति की लेखनि,ममौ लिखि आंक लाखाऊ ||
येहि विधी मुक्त भये सनाकादिक, हृदय विचार प्रकाश दिखाऊ |
कागद केवल मती - मसि कर निर्मल,विन रसना निसदिन गुन गाऊ |
कह ‘ रैदास’ राम भजु भाई,संत सांखि दै बहुरि न आऊ ||

-संत प्रवर रैदास साहब,पृष्ठ१३.

संत रोहिदासांना शालेय शिक्षण मिळाले नाही. म्हणून ते परमेश्वराला गुरु मानून आपल्या मनाचे समाधान करतात. की, ‘हे मना चल मी तुला इश्वराच्या शाळेत शिकवतो.तेथे गुरुची शिस्त आणि ज्ञानाचे अक्षर आहे. जर विसरले तर सहज समाधी लावीन. तेथे प्रेमाची पाटी आहे. आणि ईश्वर चिंतानाची पेन्सिल आहे. ज्याच्यापासून र रा-म मा अर्थात ‘राम’चे अक्षर लिहीन. शिकण्याचाही तोच

विधी आहे. ज्या विधिप्रमाणे वागून सणकादि संत मुक्त झाले आहेत.त्यामुळेच हृदयात विचार विवेकाचा प्रकाश दाखवीन. हृदय कमालरूपी कागदावर बुद्धीरूपी स्वच्छ शाईने लिहीन आणि जिभेशीवाय रात्रंदिवस गुणांचे गायन करील. रोहिदस म्हणतात, "जो पिंड ब्रह्मांडामध्ये रमत आहे, त्या रामाचे भजन करा.संतांची साखी देऊन सांगतो की, अश्याप्रकारे दीक्षा घेण्याचे येण्या जाण्याचे बंधन सुटेल. ह्या पदामुळे असे सिद्ध होते की, संत रोहिदस ही स्वयं अध्ययन करणारे,व स्वयंप्रज्ञ असावेत.असेच उदाहरण आपल्याला गौतम बुद्धांचे बाबासाहेब आंबेडकरांचे देखील पाहायला मिळते.

**संत रोहिदासांची रामसाधना -** श्री रं रामे नम: हा रोहिदासांचा मुलमंत्र होता. रोहिदास रापूजक असले तरी रामदासांचा राम हा दशरथपुत्र राम नसून त्यांचे उपास्य दैवत आणि निर्विकार असे 'सत्यराम' होते आचार्य पृथ्वीसिहाचे म्हणने आहे ते म्हणतात. रविदास के राम दशरथ संत रोहिदास हे दशरथपुत्र 'राम' उपासक नसून ते आंतरिक आतम्यातील विश्वकर्ता रामाचे उपासक असल्याने त्याचा वाणीतूनही दिसून येते.

"राम कहत येह जगत भुलाना |
सो यह 'राम' न होई |
कर्म अकर्म सुभासूभ नाही, करता नाव सो काई |
जो राम ही सब जग जाने,भरम भूल रे भाई ||
आपू आप ते कोई न जाने कहै कौन सो जाई ||
निरंजन,निराकार, निरलेपी, निरविकार,निवासी ||

रोहिदास म्हणतात,माझा राम दशरथ पुत्र नसून तो आपल्या स्वतःच्या अंतरातम्यातील (आत्माराम) राम आहे. परंतु ते कोणालाही पटत नाही. कारण हा आंतरिक आत्म्यात वास्तव्य करणारा 'सत्यराम'निरंजन,निराकार,निर्लेप,निर्विकारआणि श्वासोच्छवास विरहित आहे. रोहिदास ह्या रामाचेच स्मरण करण्यास सांगतात.

'सत्यरामाबद्दल' संत रामदास म्हणतात. 'रामनाम'अवघेच म्हणती | कोणी न जाणती आत्माराम ||

'राम' हा कालचा सूत दशरथाचा | अनंत युगांचा आत्माराम ||( गुरुदेव रानडे पृष्ठ १६२ )

खरा राम म्हणजे आत्माराम त्याला कोणीही जाणत नाही. दशरथ राजाचा मुलगा 'राम' हा अलिकडचा तर आतमाराम अनादीयुगांचा ! या आत्मारामाचे नाम म्हणजे 'दिव्यराम' म्हणजे श्रेषठव उदात्त नाम होय हेच रोहिदासांना मान्य आहे.रोहिदास रामपूजक तरी ते सर्व देवांना मानणारे होते.

रोहिदास रामपुजक असले तरी ते सर्व देवांना मानणारे होते.

"कृष्ण,करीम,राम,हरी राघव जब लग एक नवेखा |वेद, किताब,पुरातन,सहज एक नही देखा |( डॉ. सत्यमेव शिंदे उनि )

कृष्ण, करीम,राम,हरि,राघव ही नावे जरी वेगवेगळी असली तरी ते एकाच परमेश्वराचे नाव आहे वेद शस्त्र पुराण,कुराण ही सुद्धा एक असल्याचेच सांगतात. रोहिदासांना पूज्य असलेला राम समत्वाचा, अतिसमत्व यांचा प्रतिक आहे. हे त्यांच्या साखीतून दिसून येते.

देशभक्तीची जाणीव निर्माण केली-

' जो दिन दु:खी के हेत जउ,बौरे आपणे प्रान| रोहिदास उह नर सुर कौं, सांचा छत्री जान ||

जो दिन दुखी लोकांसाठी आपले प्राण गमावून रणांगणावर पराक्रम गाजवितो तोच क्षत्रिय मग तो कोणत्याही जातीचा असो अशा प्रकारची नवी परिमाला तयार करून रोहिदासांनी लोकांमध्ये देशभक्तीची व शूर वृत्तीची प्रेरणा निर्माण केली,त्याप्रमाणे जी व्यक्ति दुसऱ्यावर अवलंबून आहेआशा व्यक्तीला सर्वजण नीच समजून दु:खच देतात तेव्हा परतंत्र्याचा निषेध करून स्वातंत्र्याची ओढ निर्माण व्हावी,असा संदेशही त्यांनी आपल्या पदे व दोहयातून दिला आहे.

**स्वराज्याची जाणीव -**

'पराधीनता पाप है, जान लेहु रे मीत | 'रविदास' पराधी नता सो कौन न करै है प्रीत ||'

(आचार्य पृथ्वीराज सिंह आजाद ,उनि )

स्वराज्याची ओढ निर्माण करण्याकरता पराधीनता पाप असल्याचे सांगून एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. कुविचारांचा निषेध,सुविचारांचा पुरस्कार, स्वधर्मानुसार आचरण,परधर्माबद्दल सहिष्णुता ही सामाजिक मुल्ये अतिशय उत्तमरित्या आपल्या काव्यातून जनतेपर्यंत पोहचवली

**नवयुग प्रवर्तक संत रोहिदास -**

नवयुग प्रवर्तनामध्ये स्वधर्मांचरणाला म्हणजेच कर्म, योग प्रधान भक्तचरनाला अतिशय महत्ववाचे स्थान दिले आहे. तसेच त्यांनी स्वराज्य हेच रामराज्य असल्याचे निक्षून सांगितले,ते म्हणतात.

पराधीन को दिन क्या, पराधीन वेदिन||रैदास दास पराधीन कौ,सबही समझे हीन||

एसा चाहे राज में, जहा मिले सबन को अन्न | छोट बडे सब सम बसे, रविदास रहे प्रसन्न||

**वेद विदयेविषयी आस्था -**

रोहिदासांच्या काळातील समाज उच्चवरनियांच्या अन्यायीपानच्या वागणुकीमुळे त्रस्त झालेला होता. धर्मकारणाचे प्राधान्य ब्रह्मणांकडे होते. पारंपरिक ज्ञान केवळ ब्राह्मणांनीच प्राप्त करत राहावे आसा अन्याय संकेत समाजात रूढ झाला होता. संतांनी सर्वप्रथम याविरुद्ध आवाज उठवला. संत कबिरांचे उदाहरण आपण याठिकाणी घेतले तर त्यांनी बौद्धिक गळचेपीळीविरुद्ध आपल्या तीक्ष्ण वाणीचे जणू हत्यारच चालवले आहे. हे असे असले तरी याठिकाणी रोहिदासांची मात्र विरोधी भूमिका दिसते. त्यांचे संतुलन याठिकाणी जाणवते. त्यांनी तत्कालीन सुशिक्षित वर्गाला आपल्यात समावून घेतले. पारंपरिक ज्ञानाविषयी ते त्यांना समाज देतात. वेद विद्ये विषयीही ते आदराने बोलतात. "चार वेद जॅके सुमिरत सांसा | भक्ति हेतु गावै 'रइदासा' || ( संत रोहिदास जीवन आणि वाङमय - अशोक कामत.)

यावरून रोहिदासांची अभासू व समजभानाची वृत्ती दिसून येते कारण समाज बादलवायचा असेल तर समाजातील सत्ताधारी वर्ग कोणता आहे हे पहावे लागते,त्यातल्यात्यात युवावर्ग हाताशी आला तर परिवर्तनाचे काम झपाट्याने होऊ शकते. म्हणिण कदाचित रोहिदांसानी ब्राह्मण वर्गाकडेही तितक्याच आदराने बघितले आहे.

The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

**सर्व सर्वसमावेशकतेची भूमिका -**

त्यांच्या अनुयायांमध्ये सूफी संत,साधू,मुस्लिम अनुयायी ब्राह्मण अनुयायी स्त्रिया व तपस्वी या सर्वांचाच समावेश होता. त्यामूळे सर्व समावेशकता ही त्यांच्या अंगी असलेली दिसते.

आंध्रप्रदेश, महाराष्ट्र,गुजरात, राजस्थान आणि हमालयतील हिंदू धर्मक्षेत्रांना देखील त्यांनी भेटी दिलेल्या आहेत. त्यांनी परमात्म्याचे सगुण (गुणधर्म , प्रतिमेसह) सोडून दिले व निर्गुण ( धर्माशिवाय , अमूर्त ) परमातम्याच्या स्वरूपावर लक्ष केंद्रित केले आहे. विन्नद कॉलवेटर्नने नमूद केले आहे की रविदास यांचावर आनंतदासांनी ३० हस्तलिखिते लिहिलेली भारताच्या विविध भागात सापडली आहेत. यावरून त्यांची सर्वसामावेशकता लक्षात येते.

**रोहिदासांची श्रम साधना -**

श्रम साधनेची प्रतिषठा ही रोहिदासांनी समाजाला दिलेली देणगी आहे. ते श्रमातच ईश्वराचे रूप पाहतात. म्हणूनच ते श्रमाला ईश्वर भक्ति मानतात. श्रमसाधना ही जीवनात सुखशांतीचे अद्‌वितीय परंतु सरल आणि सोपे साधन असल्याने त्यांनी आपल्या स्वकर्तुत्वावरून दाखवून दिले की स्वकर्मालाच धर्म आणि भक्तीची जोड असली पाहिजे ते सुकर्म बनते. हेच त्यांना आपल्या पुढील वाणीतून सांगायचे आहे.

‘रोहिदास स्त्रम करी खाइही, जौ लौं पार बरसाय | नेक कमाई जऊ करइ , कबहूं न निहफल जाय ||’
(डॉ. बेणीप्रसाद शर्मा, संत गुरु रविदास )

**निष्कर्ष -**

१. संत रोहिदस एका समाज सुधारकाची व महामानवाची भूमिका सर्वत्र वटवताना दिसत आहेत. त्याचप्रमाणे सर्व जाती धर्माच्या लोकांचा स्वीकार करून सर्वसमावेशक वृत्तीचा लौकिक त्यांनी वाढवला आहे.ही त्यांच्या वृत्तीतली विशेषता आहे
२. भारतभर फिरून त्यांनी त्यांनी महान कार्य केल्यामुळे त्यांना आज सुधारक संतांपैकी एक मानले जाते. ते एक कुलभूषण कवी व तत्कालीन प्रचलित सुधारक होते असे मानण्यास वावगे ठरणार नाही.
३. त्यांची गुरु ग्रंथ साहेबा मधील रचना आजही लोकप्रिय आहे. संत रोहिदास १५ ते १६ व्या शतकादरम्यान भक्ति चळवळीचे भारतीय राहस्यवादी कवी होते. असे म्हणावयास हरकत नाही. कारण गुरु ग्रंथ साहेब या शीख धर्मग्रंथांमध्ये रोहिदासांच्या भक्तिगीतांचा समावेश आहे.
४. हिंदूधर्मातील दादूपंथी परांपरेच्या पंचवाणी मजकुरात रोहिदासांच्या असंख्य कविता आहेत रोहिदासांनी जाती आणि लिंग यातील भेदभाव हातावण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला आहे. त्याच प्रमाणे आध्यात्मिक व स्वातंत्र्य मिळवण्याच्या प्रयत्नात एकतेला त्यांनी प्राधान्य दिले आहे. त्यामुळे माहामानवाची उपाधी त्यांना योग्य ठरते.

५. त्याचप्रमाणे रोहिदासांची पत्नी लिळा हिला देखील संतांच्या पंगतीत बसायचे स्थान मिळाले आहे. या ठिकाणी इतर संतांचा विचार करता कोणत्याही संताच्या पत्नीला असा मान मिळालेला पाहायला मिळात नाही. व त्यांच्या पत्नीनेही त्याना सहयोग दर्शवला आहे.

६. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर विठ्ठल या देवतेला विशेष स्थान आहे. त्यामुळे ज्याने विठ्ठल स्वीकारला त्याला समाजाने पुढे डोक्यावर घेतले आहे. संत म्हणजे विठ्ठल भक्ति हे समीकरण सर्वत्र डिअस्ते,परंतु रोहिदासांच्या बाबतीत तसे झालेले दिसत नाही. कारण त्यांनी भक्तीसाठी 'राम' या देवतेची निवड केली आहे. आणि राम ही उच्च वर्णीयांची देवता समजली जाते. त्यामुळे बाकी जातींनी रोहिदांसाना कितपत स्वीकारले हा प्रश्नच आहे.

७. संत चोखामेळा व संत रोहिदास हे तसे पहिले तर समकालीन संत आहेत. परंतु एक उत्तरेकडे व एक महाराष्ट्रात. दोघांनीही समुपदेशनाचे कार्य केले परंतु चोखामेळा महाराष्ट्रात जन्मला असल्याने सर्व संतांच्या पंगतीत बसण्याचा मान त्यांना मिळाला आहे. तर संत रोहिदास उत्तरेत धर्म प्रचाराचे काम करत राहिल्याने महाराष्ट्रातल्या संतांच्या तुलनेत ते मागेच राहिले.

८. शिवाय भाषा हे देखील त्यांच्या प्रसिद्धीच्या आड येणारे कारण असू शकते. मराठी भाषा ही जितकी आपली वाटते ,त्या प्रमाणे हिन्दी भाषेशी जवळीक साधने थोडे कठीण जाते. ही सत्यता ही नाकारता येत नाही. ही सगळे खरे असले तरी देखील रोहिदासांच्या कार्य कर्तुत्वयाची पताका सदैव फडकत राहणार आहे व येणाऱ्या सर्व पिढयना मार्गदर्शन करत राहणार आहेत.

**संदर्भसूची :**

१. गुरु रोहिदास पृष्ठ १६.
२. भक्त रत्नावली पृष्ठ ३३ .
३. संत प्रवर रैदास साहेब,पृष्ठ १३.
४. गुरुदेव रानडे,पृष्ठ ६२.
५. आचार्य पृथ्वीराज सिंह आजाद ,उनि
६. संत रोहिदास जीवन आणि वाङमय,अशोक कामत. भारती मुद्रण मंदिर ,पुणे. प्रथमावृत्ती तुकारामबीज : शके १८८९
७. डॉ. बेनईप्रसाद शर्मा,संत गुरु रविदास
८. संत रोहिदास चरित्र आणि वाङमय,मा.आ.प्रकाशक,सचिव म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ,नवीन प्रशासन भवन, मुंबई